-: प्रेसनोट दिनांक - २०/०८/२०२४ :-

**आरोपी लोकसेवक १) विकास रोहीदास सोनवणे वय ५० वर्षे, पद - अन्न सुरक्षा अधिकारी, वर्ग-२, सहायक आयुक्त,अन्न औषध प्रशासन,रघूकुल बिल्डींग,सुभाष रोड,कोल्हापूर रा.ए १०२ लाईफ स्टाईल अपार्टमेंट, प्रतिभानगर कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

यातील तकारदार यांचे टेस्ट मॅटर्स ,१०११ कोगे- महे रोड,एमएससीबी ऑफीसजवळ,कोगे ता.करवीर जि.कोल्हापूर या नावाची फरसाण व वेफर्स उत्पादन करण्याची फर्म आहे.सदर फर्मला अन्न सुरक्षा अधिकारी श्री विकास सोनवणे यांनी दि.०५/०८/२०२४ रोजी व्हिजीट देवून फर्ममधील बेसन, तेल आणि मिरची पावडरचे सॅम्पल घेवून नोटीस दिलेली होती. त्याबाबत तकारदार हे अन्न सुरक्षा अधिकारी सोनवणे यांना भेटण्याकरीता गेले त्यावेळी त्यांनी घेतलेल्या सॅम्पलवर कोणत्याही प्रकारची कारवाई न करणेकरीता व तकारदार यांचे फर्मचा परवाना रद्द न करणेकरीता श्री विकास सोनवणे यांनी तकारदार यांचेकडे ८५,०००/- रू.ची मागणी करून तडजोडीअंती अप्रामाणिकपणे ४५,०००/- रू.मागणी केलेबाबतची तकार ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे दिलेली होती.

तकारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तकार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तकारदार यांचे टेस्ट मॅटर्स कोगे ता.करवीर जि.कोल्हापूर या फर्ममधून घेतलेल्या बेसन, तेल आणि मिरची पावडरचे सॅम्पलवर कोणत्याही प्रकारची कारवाई न करण्याकरीता आलोसे यांनी ४५,००० रूपयांची लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तकारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक १) विकास रोहीदास सोनवणे वय ५० वर्षे, पद - अन्न सुरक्षा अधिकारी वर्ग २ सहायक आयुक्त,अन्न औषध प्रशासन,रघूकुल बिल्डींग,सुभाष रोड,कोल्हापूर यांनी ४५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले.

सदरबाबत **आरोपी लोकसेवक १) विकास रोहीदास सोनवणे वय ५० वर्षे, पद - अन्न सुरक्षा अधिकारी, वर्ग-२, सहायक आयुक्त,अन्न औषध प्रशासन,रघूकुल बिल्डींग,सुभाष रोड,कोल्हापूर रा.ए १०२ लाईफ स्टाईल अपार्टमेंट, प्रतिभानगर कोल्हापूर** यांचेविरूध्द जुनाराजवाडा पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्रीमती डॉ. शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री बापु साळुंके, पोलीस निरीक्षक, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर, सहा.पोलीस उपनिरीक्षक श्री प्रकाश भंडारे, पो.हे.कॉ श्री विकास माने, सुनिल घोसाळकर, पो.ना.सचिन पाटील,पो.ना.सुधीर पाटील,मपोना संगिता गावडे, चा.पो.कॉ. प्रशांत दावणे ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) श्री.बापु साळुंके, अति.कार्यभार पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ७३०४७६९२३०. कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

(बापू साळुंके)
पोलीस निरिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर.